कोर्ट विद्यमान डॉ.रविंद्र एस होळी तहसिलदार,सेलू यांचे न्यायालय

मामला क्र.NAP-34/सिंदी (रे)/१/2016-17
मौजा :- सिंदी रे तहसिल सेलू जि.वर्धा
दिनांक :-14/4/2017

वाचा :- मुख्याधिकारी, नगर परिषद सिंदी (रे) यांचे पत्र No.NPSIN.TP./1236/2016 दि.6/12/2016

आदेश पारीत

(दिनांक :-14/04/2017)

अर्जदार श्रीमती गंगाबाई हरिरामजी कलोडे व इतर रा. सिंदी (रे) ता.सेलू जि.वर्धा यांनी नगर पालिका सिंदी (रे) यांच्याकडे मौजा सिंदी (रे) येथील शेत सर्व्हे नं. 48 आराजी 1.11 हे.आर निवासी अकृषक करुन घेण्याची मागणी केल्यावरून मुख्याधिकारी, नगर परिषद सिंदी (रे) यांनी अर्जदार यांना संदर्भिय पत्रान्वये निवासी अकृषक जमीनीमध्ये रूपांतर करुन दिलेले आहे. परंतु सदर निवासी आराजीवर अकृषक साऱ्याची आकारणी केलेली नसल्यामुळे पुढील प्रमाणे आकारणी अकृषक वापराचे दिनांक पासुन करण्यात येत आहे. त्यानुसार तलाठी सिंदी (रे) यांनी कार्यवाही करावी तसेच भविष्यात जर आकारणीचे दर वाढले तर त्यानुसार आकारणीचे रक्कम वसूल करण्यात येईल.

तक्ता

मौजा	सर्व्हे नं	एकुण आराजी	रस्ता व खुली जागा व आरक्षण	भुखंडातील क्षेत्र	अकृषक आकारणी (रूपये)	परावर्तीत कर (रूपये)	एकुण (रूपये)
सिंदी (रे)	**48**	**11000**	**4394.88**	**6705.12**	**10460/-**	**52300/-**	**62760/-**

तहसिलदार सेलू सेलू.

प्रतिलिपी :-

1) उपअधिक्षक भुमि अभिलेख, सेलू यांना माहितीकरीता अग्रेषित.
2) तलाठी सिंदी (रे) त.सा.क्र.23 यांना निर्देशित करण्यात येते की, मौजा सिंदी (रे) येथील सर्व्हे नं.48 आराजी 1.11 हे.आर ला मुख्याधिकारी, नगर परिषद सिंदी (रे) यांनी निवासी प्रयोजनार्थ परवानगी दिलेली असून वरीलप्रमाणे अकृषक चालान भरुन 7/12 नोंद घेवून अर्जदार यांना वितरीत करावा.
3) मंडळ अधिकारी, सिंदी (रे) यांना माहितीस्तव अग्रेषित.
4) वसुल बाकी नविस, तहसिल कार्यालय सेलू यांना कळविण्यात येते की, सदर आदेशाची नोंद तालुका नमुना-2मध्ये घेवून ताळमेळ घ्यावा.
5) श्रीमती गंगाबाई हरिरामजी कलोडे व इतर रा. सिंदी (रे) यांना माहितीस्तव अग्रेषित.

तहसिलदार,सेलू

सा ल व
दस्त क्र. 1236/2016
96/30